**स.के.नं. ७२१/२०२५**
**नि.क्र. ३९ /क लगत**

अभियोगपक्षातर्फे **साक्षीदार क्र. १** याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | प्रविण वसंत गावीत, |
| वय | - | ३६ वर्षे |
| व्यवसाय | - | पोलीस नाईक/३११६, |
| राहणार | - | न्हावाशेवा पोलीस ठाणे, नवी मुंबई. |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता पी. बी. देशमाने यांच्याद्वारे**

१. दिनांक ०७.०८.२०२४ रोजी ट्रेलर व रिक्षा यांचा अपघात झाला होता. त्या अपघातात रिक्षाचालक भरत ठाकुर मयत झाला होता व त्या रिक्षामध्ये असलेले कर्मचारी सचिन म्हात्रे हे जखमी झाले होते. पोलीसांनी ट्रेलर चालकास ताब्यात घेऊन कारवाई करत होते. ती कारवाई करत असताना मयताचे व जखमीचे नातेवाईक पोलीस ठाण्यात जमा झाले. त्यांनी त्या चालकाला त्यांच्या ताब्यात द्या असे म्हटले. त्यांनी बॉडी ताब्यात घेण्यास नकार दिला व बऱ्याच लोकांना जमवले. त्यानंतर ते जेएनपीटीकडे जाणाऱ्या प्रीगेट येथे एकत्रित जमले. तेथे त्यांनी वाहतुकीस अडथळा होईल असा जमाव केला. त्यांनी तो जमाव दुपारी ०२.०० ते संध्याकाळी ०४.०० या वेळात केला होता. त्या जमावामध्ये अंदाजे ४० लोक होते. त्यामुळे बदक साहेब यांनी त्या लोकांना जमावबंदीचे आदेश असल्याचे दाखवण्यास सांगितले त्यामुळे मी ते आदेश त्या लोकांना दाखवले. त्यानंतर ते लोक ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते म्हणुन त्यांना नोटीस देऊन त्यांचेविरूद्ध कारवाई केली. त्यामुळे मी फिर्याद दिली होती. आता मला ती फिर्याद दाखवली त्यावर माझी सही असुन मजकुर बरोबर आहे करीता सदर

फिर्यादला **निशाणी क्र. P1 PW 1** देण्यात येतो. आता मला प्रथम खबर दाखवली. त्यावर माझी सही आहे. करीता प्रथम खबरीस **निशाणी क्र. P2 PW1** देण्यात येतो. ज्या लोकांविरूद्ध कारवाई केली होती त्यातील काही लोक आजरोजी न्यायालयात हजर आहेत.

<u>**उलटतपास आरोपीतर्फे वकिल श्री. निनाद नाईक यांच्यामार्फत**</u>

२. आमच्या पोलीस ठाण्यात दर दिवशी ड्युट्या लावल्या जातात. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०७.०८.२०२४ रोजी माझी गोपनिय व दहशतवादी विरोधी पथकात नेमणुक होती. हे म्हणणे खरे आहे की, अपघात हा जीटीआय कंपनीच्या रस्त्यावर झाला होता. पोलीस ठाणे न्हावाशेवा पासुन ते अपघात स्थळ अंदाजे २.५ किमी अंतरावर आहे. न्हावाशेवा पोलीस ठाण्यापासुन प्रीगेट ७०० ते ८०० मीटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, तो अपघात मी स्वत: पाहिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, तो रिक्षाचालक जीटीआय कंपनीत कामाला होता. हे म्हणणे खरे आहे की, अपघातानंतर ट्रेलर चालक तेथुन पळुन गेला होता. हे म्हणणे खरे आहे की, तो अपघात त्यादिवशी सकाळी ०७.१५ ते ०७.४५ च्या सुमारास झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, जीटीआय हा परिसर सतत वर्दळीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, अपघात झाल्यास आजूबाजूचे लोक मदतील धावून येतात. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे तेथे लोकांची गर्दी होते. हे म्हणणे खरे आहे की, अपघातानंतर रिक्षाचालकास जेएनपीटी येथील दवाखान्यात आणले होते. हे म्हणणे खरे आहे की, ते दिवस पावसाळ्याचे होते. हे म्हणणे खरे आहे की, न्हावाशेवा पोलीस ठाण्यात नागरिकांच्या पार्किंगची व्यवस्था नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस ठाण्यात नेहमीच लोक वेगवेगळ्या कारणांसाठी येत असतात. हे म्हणणे खरे आहे की, येणारे लोक पोलीस स्टेशन समोर असलेल्या रस्त्याच्या बाजूला त्यांची वाहने लावतात. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस स्टेशन समोर असलेल्या रस्त्यावर थोड्या अंतरावर पुल

आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यादिवशी पाऊस असल्याने काही लोक पोलीस स्टेशन जवळ व काही लोक पुलाजवळ थांबले होते. हे म्हणणे खरे नाही की, बोकडविरापासुन पोलीस ठाण्याकडे जाणारा रस्ता अवजड वाहनांसाठी नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दिवशी वाहतुकीस अडथळा झाल्याबाबत कोणत्याही सामान्य व्यक्तींनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, अपघात झाल्यानंतर अपघातग्रस्त व्यक्तींच्या नातेवाईकांना माहिती देण्याचे काम पोलीसांचे असते. हे म्हणणे खरे आहे की, अपघातात मयत झालेल्या व्यक्तीचे शव ताब्यात देण्यासाठी त्याचे नातेवाईकास बोलावले जाते. तपास अधिकाऱ्यांनी माझेद्वारे आरोपींची ओळख परेड घेतली नाही. जमावबंदी आदेश दाखवल्याबाबत मी फिर्याद देताना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस ठाण्यात मयताचे नातेवाईकांनी जमुन ट्रेलर चालकास ताब्यात द्या असे म्हटल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांवर पोलीस निरीक्षकांचे नियंत्रण असते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी कोणताही जमाव केला नव्हता व जमावबंदीच्या आदेशाचे उल्लघंन केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

**सही/-**

**उरण,** **(एस.पी. वानखडे )**

**दिनांक – ०७/०५/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,न्यायालय क्र.१ उरण**